M E R C
Date 27/1/05
6096
No.
249/[illegible]

# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:- २६.१२.२००५

विद्युत अधिनियम,
२००३

क्रमांक.विनिआ-२००४ / प्र.क्र.७२ /ऊर्जा-३.-विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १०३ सह कलम १८० उप-कलम (२) च्या खंड (ग) मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच यासंदर्भात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे ते असे :-

## भाग - १
## प्राथमिक

१. संक्षिप्त शिर्षक -या नियमांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग निधी नियम, २००५, असे संबोधावे.

२. व्याख्या .-(१) या नियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(अ)" अधिनियम " म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) ;

(ब) " अध्यक्ष " म्हणजे आयोगाचा अध्यक्ष;

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग असा आहे ;

(ड) "आर्थिक वर्ष " म्हणजे प्रत्येक वर्षी एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवसापासून सुरु होणारा १२ महिन्यांचा कालावधी ;

(इ)" निधी " म्हणजे अधिनियमाच्या कलम १०३ मधील तरतुदीनुसार नियम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग निधी ;

(फ) "शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(ग) " सचिव " म्हणजे आयोगाचा सचिव

(२) या नियमात वापरण्यात आलेले परंतु ज्यांची येथे व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींचा अर्थ त्यांना अनुक्रमे अधिनियमात देण्यात आल्यानुसार असेल.

## भाग २
## आयोगाचा निधी

**३.निधीची स्थापना:** अधिनियमाच्या कलम १०३ च्या उप-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, राज्य शासन याद्वारे निधीची स्थापना करीत आहे. ज्यास "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग निधी" म्हणून संबोधण्यात येईल आणि निदेश देते की, या नियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या दिवशी अस्तित्वात असलेला आयोगाचा बँक लेखा या निधीच्या मुख्य लेख्यामध्ये रुपांतरित झाला आहे असे समजण्यात येईल.

**४.निधीचा वापर:** (अ) आयोगाचा अध्यक्ष लेखी प्राधिकृत करेल अशा २ अधिका-यांच्या सहीने निधीचा वापर संयुक्तपणे करण्यात येईल;

(ब) आयोगाच्या मुख्यालयाशेजारी असलेल्या कोणत्याही अनुसूचित वाणिज्य बँकेमध्ये आयोग खाते उघडेल, ठेवेल आणि चालवेल ;

(क) आयोगास प्राप्त झालेली कोणतीही रक्कम लवकरात लवकर परंतु कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त उशिरा, कामाच्या पुढील दिवशी निधीत जमा करण्यात येईल.

(ड) अध्यक्ष यांच्या प्राधिकाराने आणि मान्यतेनंतरच निधीतून रक्कमा काढण्यांत किंवा खर्च करण्यात येतील.

**५.निधीतील शिल्लक रक्कमेची गुंतवणूक :** सचिव किंवा आयोगाने याकरीता प्राधिकृत केलेला अन्य अधिकारी, शासन याकरिता वेळोवेळी जी मार्गदर्शक तत्वे , असल्यास, निर्गमित करेल त्यांना अधीन राहून, वाजवी परतावा मिळावा म्हणून, निधीमध्ये उपलब्ध असलेली शिल्लकी रक्कम, भारत सरकारने किंवा महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या कोणत्याही अनुसूचित वाणिज्य बँकेच्या किंवा वित्तीय संस्थेच्या लाभदायक अशा अल्प-मुदतीच्या किंवा दीर्घ-मुदतीच्या ठेवींत गुंतवेल. ब्रोकरेज, कमिशन इत्यादि या गुंतवणुकीच्या संदर्भातील अनुषंगिक खर्च निधीतून झालेला खर्च म्हणून दाखविण्यात येईल. अशा गुंतवणुकीवर वेळोवेळी मिळणारे उत्पन्न ही निधीची जमा रक्कम असेल.

**६. निधीतून करावयाचा खर्च :** आयोगाच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार निधीतून खर्च करण्यात येईल.

**७. संकीर्ण :** नियमाच्या किंवा नियमात स्पष्ट तरतूद करण्यात आलेली नाही, अशा कोणत्याही बाबीच्या अर्थनिश्चितीबाबत कोणतीही शंका असल्यास अशा बाबीचा संदर्भ शासनास करण्यात येईल व याबाबतीत शासनाचा निर्णय अंतीम असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भू. प्र. पाण्डेय )
शासनाचे प्रधान सचिव

**व्यवस्थापक,** शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, **महाराष्ट्र शासन राजपत्र-१** (ल) असाधारण राज्यपत्रामध्ये आज दिनांक २६.१२.२००५ रोजी प्रसिध्द करून **त्याच्या १०० प्रती** या विभागास पाठवाव्यात.

(उ.शं.भोईटे)

प्रत:-

सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ ( ५ प्रती )
सचिव, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
अध्यक्ष, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, सेवा भवन, आर. के. पुरम, नवी दिल्ली.
सचिव, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, तिसरा मजला, आय. सी. डब्ल्यू. ए. आय. भवन, ३, इन्स्टिट्यूशनल एरिया, लोधी रोड, नवी दिल्ली-११० ००३.
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (पत्राने)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव (सार्वंवि), मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
सचिव (उद्योग), उ.ऊ.व का.वि., मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव (वि. व न्या.) मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान सचिव (कामगार), उ.ऊ.व का.वि., मंत्रालय, मुंबई-३२.
विकास आयुक्त (उद्योग), नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२.
मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.वि., प्रशासकीय इमारत, २ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर(पूर्व), मुंबई-७१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, टाटा विद्युत कंपनी, बॉम्बे हाऊस, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स एनर्जी लि., इलेक्ट्रिसिटी हाऊस, सांताक्रुझ (पूर्व),मुंबई-५५.
मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-५.
कार्यकारी संचालक, मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को.ऑप. सोसा. लि., श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर.
अध्यक्ष, उद्योग मित्र, निर्मल, नरीमन पॉईंट, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अवर सचिव, कार्यासन-(ऊर्जा-५)
कक्ष अधिकारी, कार्यासन ऊर्जा-१/ ऊर्जा -३/ऊर्जा-४/ऊर्जा-७,
निवड नस्ती (ऊर्जा-२), उ.ऊ.व का.वि.